# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३४४/२०२४ दिनांक ०९/०९/२०२४

## प्रेस नोट

**“नो ब्रोकर या वेबसाईटवरुन फिर्यादी यांची ९,५०,०००/रु ची फसवणुक करणा-या तोतया रुम मालक व बनावट इस्टेट एजंट असणा-या साराईत आरोपीतांच्या टोळीला अटक करुण त्यांच्याकडुन फसवणुक झालेली रक्कम हस्तगत करण्यात काशीगांव पोलिस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.’’**

दि. १८.०८.२०२४ रोजी फिर्यादी नांमे हिना अब्दुल सलमानी, वय- ३६ वर्ष, व्यवसाय- गृहीणी, रा. टयु लिप बिल्डींग, ए विंग, रुम नं.२०४, गौरव व्हॅली, १५ नंबर जवळ, मिरारोड पुर्व ठाणे यांना मिरा रोड येथे हेवि डिपोझिटवर फ्लॅट भाड्याने पाहिजे होता फिर्यादी या नो ब्रोकर या वेबसाईटर फ्लॅट सर्चे करत असतांना त्यांना मिरा रोड येथील एक फ्लॅट आवडल्याने त्यांनी इस्टेट एजंट कुणाल सिंग यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर फोन कॉल केला इस्टेट एजंट कुणाल सिंग यांनी त्याचा मित्र इस्टेट एजंट शाहरुख अहमद यांचा मोबाईल नंबर दिला फिर्यादी यांनी शाहरुख यांना फोन केला त्यानंतर इस्टेट एंजट शाहरुख हे तक्रारदार यांना भेटले शाहरुख यांनी तक्रादार यांना लक्ष्मी पॅराडाईज बिल्डींग, रुम नं. ०५ ए विंग, भैरव रेसिडन्सीजवळ, कनकिया, मिरारोड पुर्व हा फ्लॅट दाखविला त्यांच्या सोबत एक इसम हा सदर फ्लॅटचा मालक असल्याचे त्यांनी सांगितले फिर्यादी यांना फ्लॅट आवडल्याने त्यांनी रुम मालक यांच्या सोबत हेवि डिपोझिटचे ॲग्रीमेंट तयार केले व रुम मालक यांना ९,५०,०००/रुपये दिले होते.

दिनांक २२.०८.२०२४ रोजी फिर्यादी यांनी रुमचा ताबा मिळण्या करिता इस्टेट इंजट व रुम मालक यांना फोन केला असता त्यांचे फोन बंद आले त्यांनी सदर सोसायटीमध्ये जावुन शाहनिशा केली असता सदर इसम हे बनावट इस्टेट इजंट व तोतया मालक असल्याचे त्यांना समजले त्यांनी सदर घडलेल्या प्रकारची शाहनिशा केली असता त्यांची फसवणुक झाली असल्याची त्यांची खात्री झाली त्यांनी दिनांक ०५.०९.२०२४ रोजी बनावट इस्टेट इजंट व तोतया रुम मालक यांच्या विरुद्ध काशिगांव पोलिस स्टेशन गु.र.नं. २७५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३१९(२), ६१ प्रमाणे गुन्हा नोंद केला असून नमुद गुन्ह्याचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेच पोलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे हे करत आहे.

नमुद गुन्ह्यात फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुण त्यांची फसवणुक झालेली रक्कम घेवुन बनावट इस्टेट इजंट व तोतया मालक हे फरार झाल्याने त्यांचा शोध घेवुन त्यांना अटक करण्याच्या सुचना वरिष्ठ पोलिस अधिकारी यांनी दिल्या होत्या त्या प्रमाणे नमुद गुन्ह्याच्या तपासात आरोपीतांच्या मोबाईल तांत्रिक विश्लेषणातुन नमुद गुन्ह्यात आरोपी नांमे १) शाहरुख नियाज अहमद, वय- २८ वर्ष, व्यवसाय- इस्टेट एजंट, रा. रुम नं.३०१, स्काय लाईन बिल्डींग नं. बालाजी हॉटेलजवळ, शांतीपार्क, मिरारोड पुर्व. २) आफताफ मोहनुजमा आलम, वय- ४५ वर्ष, रा. रुम नं.३०३,

बिल्डींग नं. ३, मंथन गौरव संकल्प फेज-४, बेवर्ली पार्क, मिरारोड पुर्व ३) रमेश गिसीअवन शर्मा, वय- ३७ वर्ष, रा. आय विंग रुम नं.४०३, गौरव रेसिडन्सी फेज- १, सीएनजी पेट्रोलपंपजवळ, बेवर्ली पार्क, मिरारोड पुर्व यांना अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीतांकडून फिर्यादी यांची रक्कम हस्तगत करण्यात आली असुन अटक आरोपी शाहरुख अहमद व अफताफ आलम हे साराईत गुन्हेगार असुन त्यांच्या विरुद्ध खालील गुन्हे दाखल आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. |
|---|---|---|
| १ | काशिमिरा पोलीस | ६६३/२०१६ भादविस कलम ३९२ प्रमाणे |
| २ | डोंबीवली पोलीस ठाणे | १७५/२०१७ भादविस कलम ४०६,३४ प्रमाणे. |
| ३ | मिरारोड पोलीस ठाणे | ११३/२०२३ भादविस कलम ४२०,४०६,१२० बी प्रमाणे |
| ४ | मिरारोड पोलीस ठाणे | १२३/२०१९ भादविस कलम ३७६(ड), ३५४(अ),३५४(ब) प्रमाणे. |

तरी सदर प्रेस नोट अन्वये मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तलया तर्फे नागरिकांना अवाहाण करण्यात येते कि,फ्लॅट भाड्याने, हेवि डिपोझिटवर अथवा खरेदी विक्रीचा व्यवहार करण्या पुर्वी इस्टेट इजंट व रुम मालक यांची खात्री करुण त्या फ्लॅटची शाहनिशा करुण व्यवहार केला पाहिजे गेल्या अनेक दिवसांपासुन सातत्याने इस्टेट एजंट, रुम मालक व भाडेकरु यांच्या विरुद्ध मोठ्या प्रमाणात फसवणुकीच्या तक्रारी पोलिस स्टेशनला येत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलिस आयुक्त, मिरा रोड विभाग, राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलिस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलिस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

